# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)
" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३६ | Website : http://arogya.maharashtra.gov.in |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | Email : miscall.18@gmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६२०२४९ | फॅक्स् दूरध्वनी ०२२-२२६२०२३४/२२६२१०३४ (संचालक) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | ०२२-२२६७९०४४ (सहसंचालक (रुग्णालये) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | ०२२-२२६२२१५५ (मुख्य प्रशासकीय अधिकारी) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | ०२२-२२७०३७८५ (नियंत्रण कक्ष) |
| | | ०२२-२२६२१०४७ (अंधत्व) |
| | | ०२२-२२६२५७९९ (खरेदी कक्ष) |


**आरोग्य सेवा** जा.क्र.संआसे/कक्ष-१८/विवाह मंडळ नोंदणी/11575-11675/१६

दिनांक:- १६/०९/२०१६ 7-10-2016

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद .................(सर्व)

**विषय:- विवाह मंडळांची नोंदणी करणेबाबत.....**

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष-१८/ /३४८०-३५९३/१६ दि २/०४/२०१६.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळ विनियम व विवाह नोंदणी नियम,१९९९ मधील **कलम ५ च्या** वैधानिक तरतुदीनुसार आपल्या कार्यक्षेत्रातील विवाह जुळविणारी वधू-वर सूचक मंडळे अथवा व्यक्तींनी विवाह निबंधकाकडे नोंदणी करणे अनिवार्य व कायद्याने बंधनकारक आहे. तसेच दिनांक २३ मार्च,२०१६ रोजीच्या मराठी, इंग्रजी, हिन्दी व उर्दु या चार भाषेतील राज्यातील प्रमुख दैनिक वर्तमान पत्रात विवाह मंडळांची नोंदणी करणेबाबत जाहीर आव्हान करण्यात आलेले होते. तथापी राज्यात अत्यल्प प्रमाणात विवाह मंडळांची नोंद झाल्याचे दिसुन येत आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांचेकडील **श्रीमती प्रिस्किलिया सॅम्यूअल विरुध्द केंद्र शासन व इतर** जनहित याचिका **क्रं.५२/२०१३** या संदर्भात दि.२३ मार्च,२०१६ च्या आदेशान्वये संबंधितांना सूचित करण्यात आले होते की, ग्रामीण व शहरी भागातील निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील विवाह मंडळाची नोंदणी करुन त्याबाबतची माहिती दिनांक २८ एप्रिल २०१६ पूर्वी सादर करण्याचे आदेशित केलेले होते. परंतु **जिल्हयातील सर्व विवाह मंडळांची परिपुर्ण व नावासह माहिती विवाह मंडळाची नोंदणी न केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्यापही प्राप्त झालेली नाही. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाला परिपुर्ण माहिती सादर करता आलेली नाही**, ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

आपल्या क्षेत्रातील कार्यरत विवाह मंडळाना त्यांचे विवाह मंडळांना नोंदणी करुन घेणेबाबत स्थानिक वर्तमान पत्रामधुन आवाहन करावे. विवाह मंडळांचा शोध घेण्यासाठी वर्तमानपत्रातील विवाह मंडळाच्या जाहिरात, गुगल सर्च, जस्ट डायल इत्यादीची मदत घेण्यात यावी. तसेच आवश्यकता भासल्यास पोलीस विभागामार्फत विवाह मंडळांचा शोध घेण्यात यावा. या सर्व विवाह मंडळाची निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी यांचेकडे नोंदणी करावी. ज्या विवाह मंडळानी त्यांचे मंडळांची नोंदणी करण्याचे हेतुपुरस्सर टाळले आहे, असे निदर्शनास आल्यास त्या मंडळावर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करावी.

आपण आपले स्तरांवरुन ग्रामिण व शहरी भागातील सर्व संबंधित निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी यांना त्यांच्या **कार्यक्षेत्रातील सर्व विवाह मंडळांची नोंदणी उचित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदरील पत्र निर्गमित झाल्याचे तारखेपासुन १० दिवसांचे आंत करुन घेण्याच्या सुचना द्याव्यात.**

जिल्हयातील महानगर पालीका क्षेत्राचा अहवाल देखील जिल्हयाच्या अहवालात समाविष्ट करण्यात यावा. आपल्या स्तरावरुन विवाह मंडळावर केलेल्या कार्यवाहीचा त्यांच्या नावाच्या यादीसह तपशील या कार्यालयास दिनांक ३०.०९.२०१६ पूर्वी सादर करावा. सदर माहिती मा.उच्च न्यायालय मुंबई यांचककडे सादर करावयाची असल्याने या कामास प्राधान्य देण्यात यावे.

संचालक आरोग्य सेवा तथा
निबंधक विवाह मंडळ व विवाह नोंदणी
(राज्यस्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सादर :-
मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-

| | |
|---|---|
| आयुक्त राजस्व विभाग | (सर्व) |
| आयुक्त महानगर पालिका | (सर्व) |
| जिल्हाधिकारी | (सर्व) |

प्रत ~~सादर~~ :- उपसंचालक आरोग्य सेवा तथा,निबंधक विवाह मंडळ व विवाह नोंदणी (विभागीय समन्वय), महाराष्ट्र राज्य, पुणे.